# -: सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली :--

मुख्य कार्यालय, पद्मभूषण वसंतदादा पाटील मार्ग,
कर्मवीर भाऊराव पाटील चौक, सांगली-४१६ ४१६.

## शिपाई भरती विस्तृत जाहीरात

सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि;सांगली या बँकेकडे ऑफलाईन परिक्षेद्वारे ७९ शिपाई पदे भरावयाची असून त्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविणेत येत आहेत. ऑनलाईन अर्ज https://sanglidccb.bank.in/career व www.sanglidccb.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ.नं. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १. | संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज भरणे | दि. १२/०८/२०२६ ते २१/०८/२०२६ |
| २. | परिक्षा शुल्क स्विकारणेचा अंतिम दिनांक | दि.२१/०८/२०२६ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत |
| ३. | ऑफलाईन परिक्षा दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल |
| ४. | परिक्षा प्रवेश पत्र डाऊनलोड करण्याचा दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल |
| ५. | कागदपत्रे पडताळणी दिनांक | बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल |

**सुचना :-**

१) सांगली जिल्ह्यातील मूळ रहिवाशी असणा-या उमेदवारांना १०० % प्राधान्य देण्यात येणार आहे.
२) परिक्षा शुल्क भरल्याशिवाय रजिस्ट्रेशन प्रक्रिया पूर्ण होणार नाही.
३) उमेदवारांना परिक्षा शुल्काची रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरणा करता येईल.
४) उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरतांना स्वतःचा ई-मेल आयडी, मोबाईल क्रमांक व आधार कार्ड क्रमांक अचूक भरणे आवश्यक आहे.
५) एकदा ऑनलाईनद्वारे अपलोड केलेल्या अर्जात पुनश्चः दुरुस्ती करता येणार नाही.
६) उमेदवारांने अर्ज भरतांना त्या पदासाठी आवश्यक असणारी पात्रता धारण करीत असल्याची खात्री करुनच अर्ज भरावा. अपात्र अर्जाबाबत अर्जदारासोबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.
७) सदर भरती प्रक्रियेदरम्यान वरील दिलेल्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणा-या भरती प्रक्रियेच्या अद्यावत महितीचे अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
८) रिक्त पदांची संख्या कमी जास्त होण्याची शक्यता आहे. कोणत्याही कारणास्तव रिक्त पदे वाढल्यास उपलब्ध निवड यादीतून पात्र ठरलेल्या प्रतिक्षा यादीतील उमेदवारातून सदरची रिक्त पदे भरण्यात येतील. याबाबतचे सर्व अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत. तसेच सदर भरती प्रक्रिया कोणत्याही कारणाशिवाय कोणत्याही टप्प्यावर थांबविणे अथवा रद्द करणेचे अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत.
९) विवाहीत महिला उमेदवारांच्या नावात केला असल्यास त्याप्रमाणे नाव बदलाचे राजपत्र व विवाह नोंदणी दाखला लेखी परिक्षेवेळी व कागदपत्रे पडताळणीवेळी सोबत आणणे बंधनकारक आहे.
१०) उमेदवाराने खाली नमूद केलेली शैक्षणिक पात्रता व अनुभव दि.१२/०८/२०२६ या दिनांकास प्रमाणपत्रासहित पूर्ण धारण करणे आवश्यक आहे. मुळ कागदपत्रे पडताळणीवेळी उमेदवारांचे प्रोव्हीजनल प्रमाणपत्र (Provisional Certificate) ग्राह्य धरले जाणार नाहीत.

सांगली जिल्हा मध्य. सह. बँक लि. हेड ऑफिस सांगली

**अ. शैक्षणिक अर्हता व इतर अर्हता :-**

| अ.नं. | श्रेणी | वयोमर्यादा | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १ | शिपाई | १८ ते ३५ वर्षे. | किमान १२ वी उत्तीर्ण. |

१) वयोमर्यादा व शैक्षणिक अर्हता दि.१२/०८/२०२६ रोजीपर्यंत ग्राह्य धरण्यात येईल.

२) सांगली जिल्ह्याबाहेरील मूळ रहिवाशी असलेल्या विवाहीत महिला उमेदवारांच्या बाबतीत त्यांच्या पतीचे सांगली जिल्ह्यातील मूळ अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आणि विवाह नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३) उमेदवार शिपाई पदाचे शारिरिक हालचालीचे कामकाज करणेकरिता शारीरिक दृष्ट्या सक्षम/सदृढ असणे आवश्यक आहे.

४) बँकेस कोणत्याही प्रकारचे समांतर आरक्षण लागू नाही.

**ब) निवड कार्यपध्दती :-**

**१. ऑफलाईन परिक्षा :-**

शिपाई भरती पदाकरीता ७० गुणांची ओ.एम.आर. (Optical Mark Recognition) पध्दतीने ऑफलाईन परिक्षा घेण्यात येईल. लेखी परिक्षेच्या (ऑफलाईन) प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. लेखी परिक्षेचे माध्यम मराठी असेल. परिक्षेसाठी १) मराठी २) सामान्य ज्ञान व चालू घडामोडी, ३) सांगली जिल्ह्याची माहिती ४) बुध्दीमापन चाचणी ५) बँकिंग व सहकार या विषयाच्या अभ्यासक्रमावर आधारित ७० प्रश्नांचा समावेश राहील. लेखी परिक्षेकरिता ७५ मिनिटांचा कालावधी राहील.

नैसर्गिक आपत्तीमुळे अथवा तांत्रिक कारणामुळे वा अन्य कारणामुळे विहीत दिनांकास परिक्षा घेणे शक्य नसेल तर अन्य सोईच्या दिवशी परिक्षा घेण्यात येतील.

**२. कागदपत्रे पडताळणी :-**

लेखी परिक्षेत (ऑफलाईन) प्राप्त गुणांच्या गुणानुक्रमे बँक धोरणाप्रमाणे मुलाखतीचे पूर्वी प्राथमिक कागदपत्रे पडताळणीसाठी बोलाविणेत येईल. पडताळणीसाठी सर्व शैक्षणिक प्रमाणपत्रे, वयाचा दाखला व इतर सबंधित मुळ प्रमाणपत्रे असणे आवश्यक आहे. कागदपत्रे पडताळणीवेळी प्रोव्हीजनल प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाहीत. कागदपत्रे पडताळणीसाठी उमेदवारांना मुदतवाढ दिली जाणार नाही. कागदपत्रे पडताळणीसाठी गैरहजर असलेल्या उमेदवारांना निवड प्रक्रियेतून बाद समजण्यात येईल. कागदपत्रे पडताळणीमध्ये पात्र ठरलेले उमेदवारच मुलाखतीस पात्र ठरतील.

**३. मुलाखत :-**

लेखी परिक्षेत उत्तीर्ण झालेले व कागदपत्रे पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांना गुणानुक्रमे आसनक्रमांक निहाय १:३ प्रमाणात मौखिक मुलाखतीस बोलाविणेत येईल. सदर मुलाखत ३० गुणांची असेल. उमेदवारांचे व्यक्तिमत्व, शारीरिक क्षमता, संवाद कौशल्य, बँकेची प्राथमिक माहिती, सेवावृत्ती व शिष्टाचार इत्यादी बाबी विचारात घेवून मुलाखतीस गुण देण्यात येतील. मुलाखतीस गैरहजर राहिल्यास उमेदवार अंतिम निवडीस अपात्र ठरेल.

**४. उमेदवारांची अंतिम निवड यादी :-**

उमेदवारांचे लेखी परिक्षेतील गुण व मुलाखतीमधील गुणांची बेरीज करुन एकूण १०० गुणापैकी गुणानुक्रमे अंतिम निवड सुचि व प्रतिक्षा यादी करण्यात येईल. अंतिम निवड सुचि व प्रतिक्षा यादीमध्ये समान गुण धारण करणा-या उमेदवारामध्ये १) सांगली जिल्ह्यातील उमेदवार असल्यास २) धारण करीत असलेली उच्च शैक्षणिक अर्हता ३) अनुभव याक्रमाने प्राधान्य देवून उमेदवारांची यादी मर्यादीत करण्यात येईल. त्यानुसार अंतिम निवड यादीप्रमाणे/गुणवत्ता यादीप्रमाणे पात्र उमेदवारांना बँकेच्या अटी/शर्तीनुसार परिविक्षाधीन कालावधी करीता नियुक्ती देण्यात येईल.



हेड ऑफिस सांगली

**५. परिविक्षाधीन कालावधी (Probetion Period) :-**

निवड करण्यात आलेल्या उमेदवारांचा परिविक्षाधीन (हंगामी) कालावधी १ वर्षाचा राहील. परिविक्षाधीन कालावधीमध्ये सेवा असमाधानकारक असल्यास निवड प्रक्रियेतून बाद समजण्यात येईल. कागदपत्रे पडताळणीमध्ये पात्र ठरलेले उमेदवारच पुढील निवड प्रक्रियेत राहतील. परिविक्षाधीन कालावधीमध्ये शिपाई कर्मचा-यास रु. १२,०००/- प्रतिमहिना एकत्रित वेतन देण्यात येईल.

**६. परिक्षा शुल्क :-**

परिक्षा शुल्क रु.५००/- + रु. ९०/- (१८ % जीएसटी) असे एकूण रु. ५९०/- मात्र राहील. परिक्षा शुल्क हे नापरतावा (Non Refundable) राहील. एकदा भरलेले परिक्षा शुल्क कोणत्याही सबबीवर परत केले जाणार नाही किंवा इतर कोणत्याही परिक्षा किंवा निवडीसाठी राखीव ठेवता येणार नाही. परिक्षा शुल्क भरण्याची अंतिम तारीख २१/०८/२०२६ रोजी पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील याची नोंद घ्यावी.

**क) <u>ऑफलाईन (लेखी) परिक्षेसंदर्भात उमेदवारांना महत्वाच्या सुचना</u> :-**

१. उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
२. उमेदवाराने अर्जात भरलेली माहिती/कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा सत्य माहिती दडपून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.
३. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज दाखल केला किंवा तो पदासाठीची अर्हता धारण करीत आहे म्हणजे परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस हजर राहणेचा/नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.
४. उमेदवारांनी भरती प्रक्रियेत कोणत्याही पदाधिकारी/अधिकारी यांचेकडून शिफारस/दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास वा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आल्यास कोणत्याही टप्यावर सदर उमेदवारास अपात्र घोषित करुन निवड प्रक्रियेतून बाद केले जाईल.
५. परिक्षेनंतर पात्र उमेदवारांना मुलाखतीपूर्वी कागदपत्रे पडताळणीसाठी बोलाविले जाईल त्यावेळी उमेदवारांना सर्व मुळ कागदपत्रे घेवून हजर राहणे बंधनकारक राहील. कागदपत्रे पडताळणीवेळी प्रोव्हीजनल प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाहीत. कागदपत्रे पडताळणीसाठी गैरहजर असलेल्या उमेदवारांना निवड प्रक्रियेतून बाद समजण्यात येईल.
६. उमेदवारांना परिक्षा, कागदपत्रे पडताळणीसाठी व प्रत्यक्ष मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
७. जाहीरातीपूर्वी बँकेकडे याच पदासाठी अथवा कागदोपत्री किंवा मेलद्वारे अर्ज केले असतील तर त्यांचे जाहीराती पूर्वीचे अर्ज कोणत्याही परिस्थितीत ग्राह्य धरले जाणार नाहीत. त्यांना नव्याने ऑनलाईन पध्दतीने विहीत नमुन्यात अर्ज करणे आवश्यक राहील.
८. वरील अटीमध्ये/भरती प्रक्रियेत/निवड कार्यपध्दतीत/निकषामध्ये बदल करण्याचा अधिकार बँकेस असेल व ऐनवेळी काही बदल झाल्यास तो वर्तमानपत्रात किंवा बँकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केला जाईल. याबाबत अर्ज केलेल्या उमेदवारांना वैयक्तिक स्वरुपात कळविले जाणार नाही. झालेला बदल उमेदवारावर बंधनकारक राहील. यासाठी उमेदवारांनी संकेतस्थळावर वेळोवेळी भेट देवून दिलेल्या सुचनांचे अवलोकन करावे.
९. उमेदवारांची लेखी (ऑफलाईन) परिक्षा प्रामुख्याने सांगली किंवा नजीकच्या जिल्ह्यातील परिक्षा केंद्रावर घेण्यात येतील. परिक्षार्थीची संख्या विचारात घेवून आवश्यकतेनुसार एकापेक्षा अधिक सत्रामध्ये परिक्षा घेण्यात येईल.
१०. बँकेने सदर भरती प्रक्रिया तसेच परिक्षेसंदर्भातील मार्गदर्शनासाठी कोणत्याही पब्लिकेशन एजन्सीची नियुक्ती केलेली नाही. यासंदर्भात कोणतीही जाहीरात अगर माहिती ही बेकायदेशिर आहे असे समजण्यात यावे



सांगली जिल्हा मध्य. सह. बँक लि. हेड ऑफिस सांगली

११. कांही अपरिहार्य /आपत्कालीन /तांत्रिक कारणास्तव परिक्षा स्थगित करणे/ पुढे ढकलणे,अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार बँकेस असतील.
१२. भरती प्रक्रियेसंदर्भात उद्भवणारे वाद/ तक्रारीबाबत बँकेचा निर्णय अंतिम राहील.
१३. ऑनलाईन पध्दतीने अर्ज करतेवेळी उमेदवारांना कागदपत्रे सादर करावयाची नसली तरी ज्या उमेदवाराकडे आवश्यक शैक्षणिक अर्हता आहे त्यांनीच उमेदवारी अर्ज दाखल करावा.

**ड) <u>ऑनलाईन अर्ज व ऑनलाईन परिक्षेचे शुल्क भरण्याची पध्दत</u> :-**

१. उमेदवाराने सर्वप्रथम बँकेच्या संकेत स्थळावरील विस्तृत माहिती (Advertisement) व Important Documents and Notification/ महत्वाची कागदपत्रे आणि सुचना वाचून घ्याव्यात त्यानंतर ऑनलाईन नोंदणी (New Registration) या लिंकवर क्लीक (Click) करावे आणि उमेदवारांनी आपली ऑनलाईन नोंदणी करुन जाहिरातीत दिलेल्या सुचनांचे पालन करुन ऑनलाईन अर्ज भरावा.
   २. उमेदवारांनी त्यांचा अर्ज बँकेच्या संकेतस्थळावरुन स्वतःच्या माहितीसाठी डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची राहील.
   ३. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतांना स्वतःची पूर्ण माहिती बिनचूक भरावी.

२. नोकर भरतीच्या पदाकरीता बँकेच्या https://sanglidccb.bank.in/career व www.sanglidccb.com या अधिकृत संकेत स्थळावर ऑनलाईन पध्दतीनेच अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारचे अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आय.डी. व मोबाईल क्रमांक चुकीचा/अपूर्ण असल्यास त्याद्वारे पाठविल्या जाणा-या सुचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. त्याचप्रमाणे ई-मेल आयडी व संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना बँक जबाबदार राहणार नाही. सदर भरतीप्रक्रिये दरम्यान बँकेच्या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणा-या अद्यावत माहितीचे अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

३. उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्रे अन्य प्रमाणपत्र व पुरावे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्याच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. सदर पात्रतेबाबतच्या खोट्या माहितीच्या आधारे अर्ज दाखल केल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवारावर फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात येईल. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना कांही चूक झाली किंवा त्रुटी राहिल्याने भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवारांची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. विस्तृत माहितीमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शैक्षणिक अर्हता,वयोमर्यादा इ.बाबतची पात्रता तपासून अर्ज भरावा व एकदा भरलेला अर्ज कोणत्याही स्तरावर दुरुस्त करता येणार नाही.

४. उमेदवारांची ऑफलाईन परिक्षा ही ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या विहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पुर्व तपासणी/छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. कागदपत्राच्या पुर्ण छाननी नंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. ऑफलाईन परिक्षेच्या प्राथमिक चाळणीनुसार गुणवत्तेच्या आधारे उमेदवारांनी अर्जात नमूद केलेल्या विहीत पात्रतेनुसार उमेदवारांच्या मुळ प्रमाणपत्र/कागदपत्रांची सखोल छाननी करण्यात येईल. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरिता सादर केलेल्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. सदर छाननी प्रक्रियेत अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवाराला भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही.


हेड ऑफिस सांगली

५. ऑनलाईन पध्दतीने अर्ज नोंदणी करावयाच्या सविस्तर सुचना बँकेच्या https://sanglidccb.bank.in/career व www.sanglidccb.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सदर अर्ज संकेतस्थळावर दिनांक २१/०८/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील.

७. ऑनलाईन पध्दतीने शुल्काची रक्कम व अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जाणार आहे. अन्य कोणत्याही मार्गाने परिक्षा शुल्क स्विकारले जाणार नाही. परिक्षा शुल्क दिनांक २१/०८/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत स्विकारले जाईल.

८.ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवाराने स्वतःचे अद्यावत "JPEG/PNG" या प्रकारामध्ये स्कॅन केलेले छायाचित्र (फोटो) व पांढ-या कागदावर काळ्या शाईच्या पेनाने स्वतः स्वाक्षरी करुन स्कॅन केलेली "JPEG/PNG" इमेज बँकेच्या संकेतस्थळावरील सुचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. छायाचित्र (फोटो) स्कॅन केलेली इमेजची साईज 1MB असावी. तसेच स्वाक्षरीच्या स्कॅन केलेल्या इमेजची फाईल साईज 1MB असावी (त्यापेक्षा जास्त मोठी फाईल अपलोड होणार नाही).

९.ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना स्वतःचे आधारकार्ड "JPEG/PNG" या प्रकारामध्ये स्कॅन करुन बँकेच्या संकेतस्थळावरील सुचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे. आधार कार्ड स्कॅन केलेल्या इमेजची साईज 1MB असावी.

१०.ऑनलाईन अर्ज वेबसाईटवर भरण्याची अंतिम मुदत तारीख २१/०८/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत असून त्यानंतर संकेत स्थळावरील अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

११.ऑफलाईन परिक्षेची महिती उमेदवारास ऑनलाईन फॉर्म भरताना नोंदणी केलेल्या ई-मेल/SMS द्वारे कळविण्यात येईल. तसेच परिक्षेचे प्रवेश पत्र, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती व विविध सुचना या केवळ बँकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध होतील. सदर माहिती पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाही. सदर भरती प्रक्रिये दरम्यान बँकेच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणारी भरती प्रक्रियेची माहिती अवलोकन करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. उमेदवारास परिक्षा प्रवेशपत्र ऑनलाईन पध्दतीने डाऊनलोड करता येईल. त्यासाठी उमेदवारांनी त्यांचा अर्ज भरताना **रजिस्ट्रेशन नंबर, युजर आयडी व पासवर्ड जतन करुन ठेवणे आवश्यक आहे.**

१२.राष्ट्रीयकृत/व्यापारी/खाजगी व सहकारी बँका आणि अन्य आर्थिक संस्थामधून बडतर्फ/निलंबित केलेले उमेदवार भरती प्रक्रियेसाठी पात्र असणार नाहीत. उमेदवारांनी ही माहिती बँकेस न देता भरती प्रक्रियेत सहभागी झाला आणि सदर बाब बँकेच्या निदर्शनास आल्यास भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा बँकेकडे नियुक्ती झालेवरही उमेदवारास अपात्र करणेत येईल.

१३. उमेदवारांना सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. यांचे आदेशास अधिन राहून जिल्हा कार्यक्षेत्रातील बँकेच्या कोणत्याही शाखा/कार्यालयामध्ये नियुक्ती देण्यात येईल. नियुक्तीच्या ठिकाणी उमेदवारास १५ दिवसाचे आत रुजू होणे आवश्यक राहील.

१४. ऑनलाईन अर्ज भरताना येणा-या अडचणीचे निराकरण Email;; help@sanglidccb.com या ई-मेलद्वारे व ७७७४९३१७६७ या हेल्पलाईनद्वारे करण्यात येईल.

उपरोक्त पात्रता निकष व निवड प्रक्रियेच्या निकषामध्ये बँकेने बदल केल्यास सदर बदलानुसार कार्यवाही करण्यात येईल व तो बदल उमेदवारावर बंधनकारक राहील.

हेड ऑफिस सांगली

मुख्य कार्यकारी अधिकारी